कितीही पैसा कमावला तरी वेळ परत कमावता येत नाही त्यामुळे वेळेला महत्व द्या

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ३ एप्रिल २०२५ | अंक ११२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# विरोधकांनी छातीवर हात ठेवून विचार केला तर लक्षात येईल

## वक्फ संशोधन विधेयकावर फडणवीस आक्रमक



### काय म्हणाले फडणवीस ?

**वक्फ बील पुर्णपणे पास होईल असा विश्वास आहे, सेक्युलर शब्दाचा प्रत्यय बिलातून पाहिला मिळत आहे. मुस्लिम महिलांना वक्फ बोर्डात स्थान मिळणार आहे. हे विधेयक कुठल्याही समाजाच्या विरोधात नाही. धार्मिक आस्थांच्या विरोधातही हे विधेयक नाही. मागच्या बीलामध्ये ज्या चुका होत्या, त्यामुळे जमिनी लाटल्या जात होत्या. आता ज्याची ज्याची सदविवेक बुद्धी जागृत आहेत ते या विधेयकांचं स्वागत करतील, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.**

### "अंबानीचं घर हे वक्फच्या जमिनीवर"



"लोकांच्या धार्मिक विषयात जायची काय गरज आहे. संविधानाचं उल्लंघन करण्याच काम सुरू आहे. आता आपल्याकडे दक्षिणेतील मंदिराकडे भारताला श्रीमंत करतील असं दुप्पट सोनं आहे. मग आपण वक्फ बोर्डला विरोध कशाला करायचा? एकदा जमीन वक्फ करण्यात आली, म्हणजेच समाजासाठी दान करण्यात आली. परत ती हस्तांतरित करण्यात येणार नाही. आता कायदा करायचा असेल तर असो करा की या जमिनीकडे कोणी वाकड्या नजरेने पाहणार नाही. त्यांच्या वाड-वडिलांनी वक्फला दान केलेल्या जमिनी आहेत. अंबानीचं घर हे वक्फच्या जमिनीवर आहे", असा मोठा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला.

लोकसभेत अखेर आज वक्फ संशोधन विधेयक सादर करण्यात आलं आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत वक्फ संशोधन विधेयक सादर केलं. वक्फ सुधारणा विधेयकावरून विरोधक आक्रमक झाले आहेत. तर दुसरीकडे सत्ताधारी या विधेयकाच्या समर्थनार्थ मैदानात उतरल्याचं पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता या वक्फ संशोधन विधेयकावर प्रतिक्रिया देताना विरोधकांव जोरदार हल्लाबोल केला. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. विरोधक या संदर्भातील एकही पुरावा संसदीय समितीपुढे आणू शकले नाहीत, जेव्हा काहीही उरत नाही त्यावेळी अशा गोष्टी मांडल्या जातात. विरोधकांनी छातीवर हात ठेवून विचार केला तर लक्षात येईल की विरोधी पक्ष मताची लाचारी असल्यामुळे विरोध करत आहेत. मताच्या लांगुनचालनासाठी हे बिलाला विरोध करत आहेत असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना ठाकरे गटावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा अंश त्यांच्यामध्ये बाकी असेल तर ते बिलाला विरोध करणार नाहीत. विधेयकाला समर्थन देतील अशी माझी अपेक्षा आहे. दरम्यान संजय राऊत यांच्याबद्दल प्रश्न विचारताच त्यांनी खोचक टोला लगावला आहे. माझ्या लेव्हलचे प्रश्न विचारत जा, नाहीतर मला तुमच्या बुद्धीची कीव येते असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. मात्र दुसरीकडे विरोधकांकडून या विधेयकाला जोरदार विरोध होत असून,

## धारूर दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट



किल्ले धारूर : धारूर तहसील कार्यालयात असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांची बाहेरील दलाल तसेच आतील अधिकारी दलाला मार्फत नागरिकांची आर्थिक लूट करत आहेत. हे कित्येक वर्षा पासून सुरू आहे. या कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाल्याचे दिसून येत आहे. या विषयी अधिक माहिती अशी की नाही धारूर तहसील कार्यालयात दुय्यम निबंधक कार्यालय आहे या ठिकाणी स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री ची रजिस्ट्री केली जाते केली हे कार्य कार्यालयातून व्हायला हवे परंतु असे न होता येथील अधिकारी नागरिकांना दलालान कडे पाठवतात त्या ठिकाणी नागरिकांची दलाल फसवणूक करतात त्यांना घाबरतात तुमचे काम अडचणीचे आहे असे सांगतात जर करावयाचे असेल तर तुम्हाला साहेबाना पैसे द्यावे लागतील ते आमच्या कडे द्यावा. सर्वसामान्य नागरिक घाबरतात यांच्या जाळ्यात अडकतात त्यांना पैसे देतात.विविध रक्कम लावतात यातून रजिस्ट्री खर्च झाल्या पेक्षा जास्त पैसे घेतले जातात. हा लुटीचा धंदा अनेक वर्षा पासून सुरू आहे तो आता तरी बंद व्हायला हवा. धारूर दुय्यम निबंधक कार्यालयात बाँड विक्रे ता परवाना असलेले काही जण दस्त आवेज लेखन करत आहेत ही बाब चुकीची आहे परंतु अधिकाऱ्यांशी संगनमत करून असे कार्य केले जाते. दस्त अवेज लेखनकार ही वेगळी नेमणूक असते परंतु या कार्यालयात सगळे नियम धाब्यावर बसून मोठ्या प्रमाणात नागरिकांची लूट केली जात आहे.

## खा.सोनवणे बैठक टाळून दिल्लीमधे : वक्फ सुधारणा विधायकावर मतदान



बीड: पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दि.२ एप्रील रोजी जिह्लाधिकारी कार्यालयात विविध विकास कामाचा आढावा बैठक असल्याने खा.बजरंग सोनवणे हे दि.१ एप्रील रोजी रात्री दिल्लीहुन केजला आले होते. दि.२ रोजी संसदेत वक्फ सुधारणा विधेयकावर आजच मतदान होणार असल्याने ते बीड येथील बैठक टाळून तातडीने दिल्लीला वक्फ संशोधन विधेयकावर होणा-या मतदानात सहभागी होण्यासाठी रवाना झाले. खा.बजरंग सोनवणे वारंवार बीड जिल्ह्यातील विकासाचे आणि सामाजिक मुद्दे प्रभावीपणे संसदेत मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी रेल्वे, शेती, आरोग्य आदि विषयावर जिल्ह्याचे गाऱ्हाणे केंद्रात मांडलेले आहे. त्यांनी मागणी केलेल्या अनेक मागण्या मंजूर केल्या आहेत. बीड जिह्लाधिकारी कार्यालयामध्ये दि.२ रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार यांच्या उपस्थितीत जिह्ला विकास कामांची आढावा बैठक आयोजीत केली होती. या बैठकीसाठी ते बीड येथे आलेही होते, मात्र, वक्फ सुधारणा विधेयकावर संध्याकाळी संसदेमध्ये मतदान होणार असल्याने, ही महत्त्वाची बैठक टाळून ते तातडीने दिल्लीला रवाना झाले. जिल्ह्यातील विकास कामांबाबतचे निवेदन पालकमंत्री ना. अजित पवार यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.



शिववसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांची आज मातोश्री येथे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भेट घेतली. जिल्हाप्रमुख पदाची जी जबावदारी सोपवली त्याबद्दल गिराम यांनी आभार व्यक्त केले. सततच्या दुष्काळामुळे बीड जिल्यातील शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. निवडणुकीपूर्वी कर्जमुक्तीचा नारा देणाऱ्या महायुती सरकारला जाब विचारण्यासाठी अभियान राबवणार असल्याबाबत उल्हास गिराम यांनी उद्धवजी ठाकरे यांची संमती घेतली. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीशसिह परदेशीं, ज्ञानेश्वर दाभाडे सह आदी.

## निजाम यांचा शिवसेनेने सन्मान राखला, त्यांच्याकडे त्याग, संयम, स्थिरता नाही जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांची खंत.



बीड : (प्रतिनिधी) शिवसेना पक्ष हा निष्ठावंत शिवसैनिकांच्या ताकतीवर आज ही भक्कम टिकून आहे. इतर पक्षातून येणाऱ्यांना उद्धव साहेबांनी तेव्हढाच सन्मान दिला. बीड चे शेख निजामही याला अपवाद ठरले नाहीत. एम आय एम मधून शिवसेनेत प्रवेश केला आणि बीड शहर प्रमुख पद मिळवले. परंतु त्यांच्याकडे निष्ठावंत शिवसैनिका प्रमाणे त्याग, समर्पण, संयम व स्थिरता नही. अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षाने त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असा उपरोधीक टोला जिह्लाप्रमुख उह्लास गिराम यांनी लागवला आहे. शेख निजाम शिवसैनिक केव्हाच नव्हते. परंतु एक मुस्लिम चेहरा असल्यामुळे पक्षाने त्यांचा एका शिवसैनिका प्रमाणे सन्मान राखला. त्यांना शहर प्रमुख केले. या उलट शेख निजाम यांनी पक्षाला काय दिले असा सवाल आज शिवसैनिक करत असल्याचे उह्लास गिराम यांनी सांगितले. आज अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेख निजाम प्रवेश करत असुन दादांनी निजाम यांच्या सर्व अपेक्ष पूर्ण कराव्यात व त्यांना स्थिरता द्यावी.



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना डॉ.क्षीरसागर यांच्यासह डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# भोपा येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभार; अंगठा लावुनही धान्य देण्यास नकार



किल्ले धारूर : भोपा येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढतच असुन, सदर दुकानदार नागरिकांचे अंगटे घेऊन ही धान्य देत नसल्याची तक्रार भोपा येथील अनेक नागरिक करत आहेत. त्यामुळे बहुतांश नागरिक रेशनच्या धान्यापासून वंचित राहत आहेत. तरी पुरवठा विभागाच्या जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मनमानी करणाऱ्या भोपा येथील दुकानदारावर कारवाई करून, त्याचा परवाना निलंबित करावा.अन्यथा यासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा अशोक घडगे यांनी दिला आहे. तेलगाव पासुन जवळच असलेल्या भोपा ता.धारूर येथील स्वस्त धान्य दुकानदार गेल्या कांही वर्षापासुन मनमानी कारभार करत असुन, त्याच्या विरोधात कुणी बोलले तर तो त्या बोलणारास रेशनचे धान्य देत नाही.असे येथील ग्रामस्थांनी सांगितले.याबाबत दोन दिवसापुर्वी पाडव्याच्या दिवशी भोपा येथील तरूण अशोक घडगे स्वस्त धान्य दुकानात धान्य आणण्यासाठी गेला होता.यावेळी सदर दुकानदाराने त्या तरूणाचा अंगठा घेतला.मात्र त्याला धान्य दिलेच नाही.उलट म्हणाला तुला धान्य देत नाही.तसेच तुझ्या घरातील कुणाचीही केवायसी ही करत नाही.तुला काय करायचे कर. कुठे ही तक्रार केली तरी माझे कांही होत नाही. असे दुकानदाराने म्हटल्याचे अशोक घडगे याने सांगितले.याबाबत धारूरचे पुरवठा अधिकारी नायब तहसीलदार यांना मोबाईलवरून झालेला प्रकार सांगितला असता.तुम्ही तहसील कार्यालयात येऊन त्या स्वस्त धान्य दुकानदाराची तक्रार करा.नंतर मी पाहतो.असे उत्तर देत उडवाउडवी करण्याचा प्रयत्न केला.दरम्यान भोपा येथील तो स्वस्त धान्य दुकानदार अनेक नागरिकांना अंगठे घेऊन ही धान्य देत नसल्याचे नागरिक सांगत आहेत. त्यामुळे या दुकानदारावर कारवाई करण्यास का कचरत आहेत. असा प्रश्न नागरिक करत आहेत. तरी याप्रकरणी पुरवठा विभागाने भोपा येथील त्या दुकानदारावर कारवाई केली नाही.तर यासाठी आंदोलन करण्यात येईल. असा इशारा अशोक घडगे यांनी दिला

## कारवाई न केल्यास आंदोलन करणार-घडगे

### पुरवठा अधिकाऱ्याशी अर्थपुर्ण व्यवहार; त्यामुळेच कारवाईस टाळाटाळ!

धारूर तहसील कार्यालयाचे पुरवठा अधिकारी यांचे भोपा येथील संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराशी अर्थपुर्ण व्यवहार असल्याने ते त्या दुकानदारावर कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याची चर्चा भोपा येथील नागरिकांतून ऐकावयास मिळाली.त्यामुळे पुरवठा अधिकारी आता तरी कारवाई करतील का ?असा प्रश्न नागरिक करत आहेत.

# संपादकीय

## हक्काचं माणूस

आपल्याला खूपदा मनमोकळे बोलायला, सुख-दुःख, टेन्शन त्रास शेअर करायला कोणी ना कोणी असावं असं वाटतं असतं. असं कोणीतरी हवं जे आपल्या भावना समजून घेईल, आपल्याला समजावून सांगेन, आपली मनस्थिती सांभाळेल असं हक्काचं माणूस कोणत्याही रूपात आपण शोधत असतो. अनेकदा आपल्याला अशी माणसं मिळतात पण! कधी मित्र, मैत्रीण, शेजारी, सहकारी यांच्या रूपाने कोणीतरी आपलं खूप जवळचं होतं, खास होतं, आपला विश्वास जिंकून घेत. एकदा का आपली कोणाशी गट्टी जमली की मग आपण आपल्या भावनांना अगदी मोकळी वाट त्या व्यक्ती समोर करून देतो. अगदी आपल्या बालपणीपासून आपली प्रेमप्रकरण, मग लग्न, आपला जोडीदार,आपली नोकरी, व्यवसाय, आपली आर्थिक परिस्थिती, आपल्या तब्येतीच्या समस्या, आपले नातेवाईक या सर्व गोष्टी यातील चांगले-वाईट अनुभव आपले आपल्या घरातील सगळ्यांचे गुण-दोष, स्वभाव, आपल्या अडचणी, आवडी-निवडी सगळं काही समोरील व्यक्तीला पहिल्या दोन तीन भेटीमध्येच सांगून टाकतो किंवा काळानुरूप सांगत जातो.समोरील व्यक्ती मात्र आपल्याला त्याच्याबद्दल, त्याच्याशी संबंधित इतर लोकांबद्दल कितपत माहिती देते आहे, ती माहिती खरी आहे की खोटी आहे याचा आपण कधी विचार किंवा शहानिशा करत नाही. आपण कोणीतरी सांगायला, ऐकायला मिळालं आणि आपल्या दुःखावर फुंकर घालायला मिळालं यातच इतकं भारावून जातो की समोरील व्यक्तीची पारख करण्यासाठी आपण वेळ घेत नाही. समोरील व्यक्तीचा स्वभाव, व्यक्तिमत्त्व कसं आहे, तो किती विश्वासू आहे, किती गांभीर्याने तो आपल्याला मदत करणार आहे, त्याची विचार शक्तीपात्रता काय आहे हे आपण लक्षात घेत नाही. फक्त आपल्या पुरतीच माहिती सांगून आपण थांबत नाही तर आपले घरातले बाहेरचे खासगी आयुष्य सुद्धा उलगडून सविस्तर समोरच्याला सांगून टाकतो. आता जोपर्यंत आपले अशा व्यक्तीशी स्नेहसंबंध चांगले असतात, नात्यात गोडवा असतो तोपर्यंत ती व्यक्ती आपल्याला वेळोवेळी धीर देणे, आधार देणे, आपल्याला भावनिक, मानसिक साहाय्य करणं यामध्ये खूप पुढाकार घेते. खूपदा आपल्याला आर्थिक मदत करणे, आपल्या घरच्यांशी आपण कसे वागावे हे ठरवणे, आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेणे इथपर्यंत हक्क आपण त्या व्यक्तीला देऊन टाकलेला असतो. आपल्या जीवनातील प्रत्येक घटना, घडामोडी, अनुभव याचा सर्व पसारा आपण अशा एका व्यक्ती पुढे मांडतो ज्याला आपण पूर्ण ओळखलेलं पण नसतं. खासकरून आपले वीकपॉइंट म्हणजेच आपल्या अथवा आपल्या घरातील जवळील लोकांच्या कमकुवत बाजू सुद्धा आपण जाहीर करून टाकलेल्या असतात. ज्यावेळी समोरच्या व्यक्तीकडे आपल्याबद्दल इतकी माहिती उपलब्ध असते त्यावेळी त्याने आपल्याला पूर्ण ओळखून घेतलेलं असतं. अनेकदा असे होते की ज्या व्यक्तीला आपण आपल्याबद्दल आपल्या घरातल्या जवळच्या लोकांबद्दल इत्यंभुत माहिती दिलेली असते तीच आपल्या विरोधात वापरली जाते. आपल्याला समाजात बदनाम करायला, आपल्याला आपल्या माणसांपासून दूर करायला, आपला आर्थिक गैरफायदा करून घ्यायला, आपल्या इतर नातेसंबंधामध्ये तणाव निर्माण करायला ही माहिती लोकं चातुर्याने वापरतात. आपलाच चार माणसात अपमान करायला, आपली दुःख चर्चेचा विषय करून गावभर सांगायला हीच लोकं कारणीभूत असतात. आपण त्यांच्या जवळ बोललेली गोपनीय माहिती सगळीकडे पसरवून त्यावर टीकाटिप्पणी करणे, आपलीच प्रतिष्ठा धुळीला मिळवणेकामी आपणच दिलेला डाटा वापरला जातो. वेळप्रसंगी या उपलब्ध माहितीच्या आधारे आपल्याला इमोशनल ब्लॅकमेल करून स्वतःचा स्वार्थ साधायलासुद्धा असे लोकं मागे-पुढे पाहत नाहीत. आपल्याशी तोंडावर गोड बोलून, आपली स्तुती करून, आपल्याला चढवून देऊन, आपल्या माघारी मात्र हे लोकं आपल्याला पूर्ण उघड करतात. अशा लोकांना वेळीच ओळखणे, त्यांच्यापासून सावध होणे आपल्याला जमले नाही तर आपलं पूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकतं. आपल्या घरातले आपल्यापासून कायमचे तुटू शकतात, आपल्या जवळचे हक्काची लोकं दुरावले जाऊन नको ते लोकं आपल्या आयुष्याचा ताबा घेऊ शकतात. एकदा आपण अशा लोकांच्या पूर्ण आधीन झालो, आपल्या स्वतःच्या लोकांपासून दुरावलो की आपली अधोगती सुरू होते. आपल्या स्वभावातील सवयीतील सर्व बारकावे माहिती झाल्यामुळे आपण या भ्रमात असतो की समोरचा आपल्याला किती व्यवस्थित ओळखतोय, आपल्या परिस्थितीची त्याला किती जाण आहे, जाणीव आहे, काळजी आहे. बाहेरील व्यक्तीला माझी कदर आहे, माझ्याबद्दल आदर आहे आणि आता तीच माझी सर्वस्व आहे. आपण सातत्याने आणि सदैव हेच लक्षात ठेवलं पाहिजे की जी आपली हक्काची माणसं असतात, आपल्या कुटुंबातील, रक्ताच्या नात्यातील माणसं जी आपली कोणी ना कोणी लागत असतात त्यांच्या इतकं मौल्यवान या जगात कोणीही नसतं. घरातील माणसं रागावतील, भांडतील, चिडतील, अबोला धरतील पण त्यामुळे नातं कधीच तुटत नसतं. एकमेकांवरील हक्क, अधिकार, प्रेम, काळजी यातून त्यांना आपल्याला बोलण्याचा, सल्ला देण्याचा, वेळप्रसंगी कठोर वागण्याचा पूर्ण अधिकार असतो. घरातील माणसं कधीच गोड बोलून आपली खोड मोडत नाहीत जी बाहेरची परकी आणि मतलबी जगातील माणसं करतात. आपल्या खऱ्या जवळच्या व्यकींना कधीच आपलं नुकसान झालेलं, वाईट झालेलं पाहावत नसतं म्हणून ते आपल्यासाठी झटतात, आपल्याशी वाद घालतात,

# अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली भटक्या विमुक्त समाज बांधवांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

### सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एकनाथजी शिंदे सक्षम- आनंदजी जाधव

बीड, प्रतिनिधी- हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिह्लाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिह्लाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून शिवसेना उप नेते आनंदजी जाधव, बीड जिह्ला संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भटक्या विमुक्त समाजातील आप्पा राजाराम शिंदे ,भगवान शिंदे, भारत शिंदे, प्रकाश आप्पा शिंदे, गोरखनाथ धर्मराज बाबर, सुदाम संताराम चव्हाण, कृष्णा सुदाम चव्हाण, लक्ष्मण नारायण बाबर, सागर नारायण बाबर ,अर्जुन शिंदे, सखाराम दादाराव शिंदे, नाथा सुदाम शिंदे, उत्तम आप्पा शिंदे ,सुरेश शिंदे, विजय भगवान शिंदे, लखन सुदाम चव्हाण, ज्ञानेश्वर शिंदे, बाबुराव तुकाराम बाबर, राजू पुरुषोत्तम वाघेश्वर, किरण राजू वाघेश्वरी, करण अरुण वाघेश्वरी, नारायण गंगाराम चव्हाण, सागर शिवाजी शिंदे, ऋषिकेश बेद्रे या बांधवांनी जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना उप नेते आनंदजी जाधव, जिह्लासंपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना जिह्लाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी भगवा झेंडा हाती देऊन भटक्या विमुक्त समाज बांधवांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यथोचितपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे यामुळेच बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती-धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिह्लाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना बीड जिह्ला संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना जिह्लाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर तथा शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एकनाथजी शिंदे सक्षम- आनंदजी जाधव

भटका विमुक्त समाज हा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्तच राहिला आहे याचे दुःख आहे. पण आता काळजी नसावी, कारण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणारे, गोरगरीब व अनाथांच्या जीवनातील आशेचा किरण आहेत. प्रखर इच्छाशक्तीने राज्याच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असलेले लोकनेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब अठरा पगड जातीच्या कार्यकर्त्यांना सक्षम आधार आणि ताकद देणारे नेतृत्व आहे. भटका विमुक्त समाज आता विकासापासून वंचित राहणार नाही. आम्ही सर्वजण एकत्रितपणे आपल्या समस्या अडचणी सन्माननीय शिंदे साहेबांजवळ मांडून त्या सोडवू असे शिवसेना उप नेते आनंदजी जाधव यांनी आपल्या भाषणात म्हंटले.



# जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस व वादळी वारे वाहण्याची शक्यता नागरिकांनी सावधगिरी बाळगावी

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. 02 एप्रिल 2025 रोजी दुपारी 13:38 वाजता दिलेल्या सूचनेनुसार बीड जिल्ह्यासाठी दि. 2 एप्रिल 2025 ह्या दिवसासाठी ऑरेंज (Orange) व 3 एप्रिल 2025 ह्या दिवसासाठी यलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. दि. 2 एप्रिल 2025 रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 50 ते 60 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह गारपीट होण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. दि. 03 एप्रिल 2025 रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 40 ते 50 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी काळजी घ्यावी.

या गोष्टी करा - विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्याने बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करु नका- आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका.उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

# तहसीलदाराच्या दालनासमोरच शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून घेतले सायंकाळी उशिरापर्यंत तहसीलदार पोलीस निरीक्षक कार्यालय ठाण मांडून

किल्ले धारूर मोजणी केलेली शेताची पाहणी करण्यासाठी तहसील प्रशासन पोलिसासह आसरडोह येथील शेतात गेल्यानंतर एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून घेतल्याची घटना तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनासमोर मंगळवारी दुपारी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली .तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यास धरल्यामुळे पुढील अनर्थ टाळला. अशोक रामकिसन शिंदे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. धारूर तालुक्यातील आसरडोह येथील दीपक साळुंखे यांची सर्वे नंबर २३९ मध्ये २२ एकर जमीन आहे. या जमिनीतील काही भागावर शेजारीच असलेल्या सर्वे नंबर मधील काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले आहे . या संदर्भात दीपक साळुंखे यांनी शासकीय नियमानुसार सर्वे नंबर २३९ ची मोजणी आठ महिन्यापूर्वी केलेली आहे . मोजणी केलेली असतानाही शेतकरी मोजणी प्रमाणे जमीन वहीती करू देत नव्हते .मोजणी केलेली जमीन वैदिक करून देत नसल्याने७ मार्च रोजी दीपक साळुंखे या शेतकऱ्याने पोलीस प्रशासनाकडे२६ हजार रुपये भरून मोजणीक जमीन ताबा देण्यासाठी विनंती केली होती . संबंधित लगतचे शेतकरी अतिक्रमण केलेली जमीन सोडत नसल्याने अतिक्रमण झालेले जमीन मिळवण्यासाठी आणि सर्वे नंबरची हद्द निश्चित करण्यासाठी पोलीस प्रोटेक्शन सह तहसीलदार यांना जमिनीच्या स्पॉटवर नेण्यात आले होते .प्रशासनाकडून मोजणी केलेल्या शेतीची पहाणी करण्याचे काम सुरू असतानाच .यातीलच अशोक शिंदे या शेतकऱ्यांनी माझे अतिक्रमण नाही असे म्हणत तहसीलमध्ये घुसून तहसीलदारांच्या दालनासमोर पेट्रोल अंगावरओतून घेण्याचा प्रयत्न केला . यावेळी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्याला पेट्रोल वाचण्यापासून प्रयत्न केला . त्यामुळे तहसील कार्यालयातील अनुसूचित प्रकार टळला . या शेतीच्या वादा संदर्भात तहसील कार्यालयामध्ये रात्री साडेआठ वाजेपर्यंत तहसीलदारांच्या दालनामध्ये यासंदर्भात चर्चा सुरू होती.

# जिल्ह्यातील सामाजिक दरी कमी करण्यासाठी बळीराम गवतेंसारख्या तरुणांनी पुढे येऊन काम करावे

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन, युवा संवाद मेळाव्याला प्रचंडी गर्दी, पवारांनी केले सलग तासभर मार्गदर्शन

बीड: मागील काही महिन्यात अनेक कारणांनी जिल्ह्याची बदनामी होत आहे. ही बदनामी रोखण्यासाठी तरूणांनी पुढे येणे अपेक्षित असून बळीराम गवते यांच्यासारख्या तरूणांनी पुढे येऊन सामाजिक दरी कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत, शिवाय विकास कामांच्या अडचणी असतील तर येऊन सांगा, आपण मदत करू असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. दि.२ एप्रील रोजी बीड येथे बळीराम गवते यांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजीत केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस युवा संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अमरसिंह पंडित, आ. प्रकाश सोळंके, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, कल्याण आखाडे, जिह्लाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, मा.आ.बाळासाहेब आजबे, संध्या सोनवणे, बबन गवते, अविनाश नाईकवाडे, रूपेश बेदरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बीड ही देवदेवतांची भूमी आहे. मागील काही महिन्यात बीडची बदनामी सुरू आहे. बदनामी करणाऱ्या गोष्टी आपल्याला थांबवायच्या आहेत. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे विचार पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी ही तरूणांची आहे. बळीराम गवते आणि त्यांच्या टिमने पुढे येऊन दोन समाजातील दरी करण्यासाठी काम करावे. दरम्यान, आपल्या सोबत असलेले कार्यकर्ते स्वच्छ प्रतिमेचे असावेत, कार्यकर्ते तपासून घेतले नाहीत तर त्याचे परिणाम नेत्यांना भोगावे लागतात. बीडच्या विकासासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करायचे आहेत. येणाऱ्या काळात जास्तीचा निधी इथे कसा देता येईल, ते मी पाहतो. तरूणांनी शेतीत उत्पादन वाढीसाठी नवीन प्रयोग करावेत, असे सांगत बीडमध्ये तारांगण केले जाणार आहे. विमानतळ जिल्ह्याच्या जवळ असले पाहिजे. उगीच ते इकडे करा, तिकडे करा, असे म्हणू नका. पक्षाचा विचार लोकांपर्यंत पोहचवा. सोशल मीडियाचा योग्य वापर करा. तेढ निर्माण होईल अशा पोस्ट करू नका. दादागिरी खपून घेतली जाणार नाही. धागेदोरे लांबपर्यंत पोहचत असल्यास त्यावर पण कारवाई केली जाईल, असा इशाराही अजित पवारांनी दिला. दरम्यान, या मेळाव्याला उत्स्फुर्त प्रतिसाद पाहून अजित पवार यांनी उपस्थित युवकांना सलग तासभर मार्गदर्शन केले.

मेळाव्याचे चोख नियोजन, दादांकडून कौतूक बळीराम गवते यांच्यावर पक्षाने युवा संवाद मेळाव्याची जबाबदारी अगदी चार दिवसांपुर्वी सोपविली. यानंतर मागील चार दिवसात बळीराम गवते आणि



त्यांच्या टिमने मेहनत घेतली. यानंतर बुधवारी संवाद मेळाव्याला सकाळी ८ वाजल्यापासून बीड मतदारसंघातून कार्यकर्ते वाजत गाजत नाटयगृहात दाखल झाले होते. कार्यकर्त्यांनी नाट्यगृह ओव्हरफ्लो झाल्याचे पाहून आणि बळीराम गवते यांचे बारीक नियोजन पाहून अजीत पवार यांनी व्यासपिठावर येताच नियोजनाचे कौतूक केले.

गवतेंकडून मागणी, पवारांकडून नाटयगृहासाठी निधीची घोषणा युवक नेते बळीराम गवते यांनी आपल्या भाषणा दरम्यान, सार्वजनिक हिताच्या चार मागण्या अजित पवार यांच्याकडे मांडल्या होत्या. यात धाकटी पंढरी क्षेत्र नारायण गड विकास कामासाठी पर्यटन विकास योजनेतून १७ कोटींच्या कामांना मंजूरी देण्यात यावी, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरूस्तीसाठी निधी द्यावा, बीड मतदारसंघातील शाळांची दुरूस्ती, नवीन इमारती द्याव्यात, डोमरी तलावाच्या डाव्या कालव्यातून बेलूरा तलावात पाणी सोडावे, टुकुर,डोमरी,शिंदफना, बिंदुसरा या नद्यावर बंधारे करण्यात यावे. या मागण्या होत्या. यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची दुरावस्था झाली असून त्यासाठी निधी देण्याची मागणी केली होती. यामागणीबाबत अजित पवार यांनी येत्या काही दिवसात माझी टिम बीडला येईल, ती सर्वेक्षण करेल आणि या नाटयगृहासाठी लागेल तितका निधी आपण उपलब्ध करून देऊ, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

तर मातीत घालेल, कंत्राटदार, अधिकाऱ्यांना इशारा

बीड जिल्ह्यासाठी मी पालकमंत्री या नात्याने राज्याच्या तिजोरीतून भरिव निधी आणतो, परंतु याठिकाणी कामेही दर्जेदार झाली पाहिजेत. दिलेल्या निधीतून जर रस्त्याची कामे दर्जेदार झाली नाहीत तर काम करणाऱ्यांना, करून घेणाऱ्यांना मातीतच घालतो, असा दम भरत मी स्पेशल पथके पाठवून कामांची तपासणी देखील करणार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले. बीडमध्ये अधिकारी चांगले नाहीत, अशा तक्रारी आलेल्या आहेत. अनेक अधिकारी जिल्ह्यातच फिरून फिरून येतात. त्यांना चांगली कामे करायची नाहीत. लोकांना उध्दट बोलायचे. आपले कोणीच काही करणार नाही, असे वागायचे. हे योग्य नाही, असे ते म्हणाले.

०

कौशल्य विकाससाठी २०० कोटी आणू

बीड जिह्लत बेरोजगारी आहे. ही बेरोजगारी कमी करण्यासाठी तरूणांकडे कौशल्य आवश्यक आहे. येथील तरूणांना वेगवेगळे प्रशिक्षण देण्यासाठी आपण टाटाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात २०० कोटी रूपयांची गुंतवणूक करायला लावत आहोत. याठिकाणी तरूणांना व्यवसायीक शिक्षण, प्रशिक्षण मिळेल आणि यातून त्यांच्या हाताला काम मिळेल. बीड जिल्ह्यातून तरूण मोठ्या प्रमाणात ऊसतोडीला जातात. आता हार्वेस्टर आले असून हा व्यवसायही बंद होईल. तेव्हा हे कौशल्य विकास कार्यक्रम कामी येईल.२०० कोटींच्या गुंतवणूकीबाबत बोलणी सुरू आहे. ते काम लवकरच सुरू झाल्याचे दिसेल, असेही ते म्हणाले.

०

मनमोकळ्या गप्पा अन् टोलेही

राष्ट्रवादी पक्ष वाढविण्याकरीता आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी कामाला लागा, असे सांगत पक्षात एकमेकांचे कार्यक्रम कट करण्यासाठी प्रयत्न करू नका, त्यातून काहीही साध्य होत नाही. हेकेखोरपणा बरा नाही, सर्वांना सोबत घेवून चला, असे टोले लगावले. तर युवा संवाद मेळाव्यातील संपुर्ण भाषणात अजित पवार यांनी आयोजक बळीराम गवतेंचे अनेकदा नाव घेवून राजकारणातील नेतृत्वाची दिशाही दर्शवली.

# छावा जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांना बंधुशोक



केज : तालुक्यातील मौजे उंदरी येथील नरसिंह ( बापू) आबासाहेब ठोंबरे यांचे दिनांक- ३० मार्च रोजी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने ठोंबरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.ते छावा मराठा संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांचे लहान बंधू होते. स्व. नरसिंह ( बापू) आबासाहेब ठोंबरे हे कळंब येथे बहिणीकडे शिकण्यासाठी म्हणून गेले होते. तेथेच अकरावी पर्यंत शिक्षण घेत गुजरात येथे कंपनीत काम करून राजेश बॅटरी नावाने बॅटरीचा व्यवसाय मेहुण्यांनी सुरू करून दिला. मात्र स्वकर्तुत्वाने त्यांनी या छोट्या व्यवसायातून वटवृक्ष निर्माण केला. ज्याचे आज पुणे,लातूर, बीड, धाराशिव, केज या ठिकाणी शाखा आहेत. स्वकर्तत्वावर धाराशिव जिल्ह्यातील एक नामांकित व्यापारी म्हणून ओळखले जात होते. अनेकांना रोजगार उपलब्ध करून कुटुंबाचा आधार बनले होते. अगदी कमी वयात कमी ,अल्प कालावधीत त्यांनी गरुड झेप घेऊन जगाच्या पुढे एक आदर्श ठेवला आहे. त्यांच्या पश्चात एक चुलते, एक चुलती, आई,पत्नी, दोन मुले, चार भाऊ, पाच बहीणी असा मोठा परीवार आहे.

# जीवाची वाडी येथे गुढी पाडव्या निमित्त कीर्तन संपन्न



केज : आप्पाराव सारूक दि.३० रोजीरूढी परंपरा नुसार मूळ जीवाची वाडी येथील रहिवासी व पंढरपूर येथे कायम वास्तव्यस असणारे ह.भ.प.श्री.कृष्णा भागवत चौरे, महाराज पंढरपूर,यांचे आज दि.३०मार्च-२०२५ रोजी दुपारी १ते०३:०० वाजता या वेळेत कीर्तनाचे आयोजन ग्रामस्थ जीवाचीवाडी कर यांनी के ले. कीर्तन सेवा रुपीअभंग।।रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी बहुत सुखदुताची जोडी म्हणून विठ्ठल आवडी तोहा विठ्ठल भरवा तोहा माधव भरवा सर्व सुखाचे आगर बापरूकमा देवीवर।। तसेच गुढीपाडव्यानिमित्त काला व श्रीकृष्णाच्या खोडी लिला यांचे विविध दृष्टांत देत किर्तन संपन्न झाले कार्यक्र मास टाळकरी, विणेकरी, मृदंगाचार्य, गायक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# रोटरीने मिडटाऊन कडून होणार बीड नगरीमध्ये हार्दिक स्वागत



बीड - रोटरी ही आंतरराष्ट्रीय सामाजिक संघटना आहे १९०५ मध्ये स्थापन झालेली संघटना बीडमध्ये गेल्या ३४ वर्षापासून वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या भागांमध्ये अनेक समाज उपयोगी काम करते जसे की पर्यावरण ,माता व बाल संगोपन , स्वच्छता व पाणी व्यवस्थापन ,साक्षरता, शांतता व इतर अनेक क्षेत्रांमध्ये काम करते. बीड शहराच्या चारही दिशेला रोटरीने स्वागत बोर्ड लावलेले आहेत बोर्डच्या एका बाजूला स्वागत व दुसऱ्या बाजूला रोटरी ची चतुरंग जीवन दृष्टी म्हणजे आपण समाजामध्ये कसे राहिले पाहिजे कसे बोलले पाहिजे आणि याचे फायदे काय होतात याचा उल्लेख केला आहे,बोर्डचे अनावरण डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू, असिस्टंट गव्हर्नर रो.गणेश मुळे,वाहतूक शाखेचे पोलीस अधीक्षक सानप साहेब, तसेच जाधवर साहेब, बीड ग्रामीणचे बंटेवाड साहेब, महाराष्ट्र राज्य उप प्रादेशिक अधिकारी बालाजी धनवे साहेब, सराफा असोसिएशनचे सचिव रवी आहेर , तसेच डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. नितीन खंडेलवाल, रो.विवेक मनियार डॉ. सुमित्रा गादिया, यांच्या हस्ते करण्यात आले या बोर्ड साठी दहिवाळ सुवर्णकारचे रो. जनार्दन दहिवाळ, कैलास ज्वेलर्स चे रो.कैलास मैड, रो.डॉ. शिवाजीराव देशमाने तसेच श्री मोटरचे नितीन गोपन यांचे सहकार्य लाभले. यावेळी अध्यक्ष.रो. इंजि. नितीन गोपन, सचिव डॉ. निलेश जगदाळे,,पि .डी. जी. हरीश मोटवानी, प्रोजेक्ट चेअरमन रो. इंजि. राहुल बोरा, रो. डॉ. प्रकाश कोंका, रो. सूर्यकांत महाजन,रो.अनिल कुकडेजा रो. इंजि.अमोल तळेकर, रो .प्रा. नितीन भोसले रो.अभिजीतसिंह ठाकुर,रो. लक्ष्मण मळेकर, रो.संतोष पडोळे, रो.डॉ. शिवाजी देशमाने, रो.जनार्दन दहिवाळ, ,रो. सुरेश बुद्धदेव, रो.संजय गुप्ता,रो. मनोज ठिगळे,रो. बाबासाहेब कुडके,रो. गणेश वाघ, रो.सर्वज्ञ जोशी व इंजिनीयर सातपुते साहेब हेही उपस्थित होते या बोर्डमुळे रोटरीची ओळख सर्वांना होणार आहे आणि या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# पिंपळनेरच्या आदिती पेंढारेचे सुयश



बीड - तालुक्यातील पिंपळनेर येथील रहिवासी व बीड येथील शिवाजी विद्यालयाची विद्यार्थीनी आदिती विनोद पेंढारे हिने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत सुयश प्राप्त केले असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. बीड येथील शिवाजी विद्यालयात पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेल्या अदिती पेंढारे हिला नवा ेदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी गणेश कदम या शिक्षकाने बहुमोल असे मार्गदर्शन केले ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असून नवोदय विद्यालयात प्रवेश तिने निश्चित केला आहे. तिच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक आर. आर. वाघमारे, शिक्षिका जे.एन. काकड े, शिक्षक ए. बी. देवगुड े सह दीपक पेंढारे, पांडुरंग पेंढारे, अरुण पेंढारे, देविदास पेंढारे, विनोद पेंढारे, गोविंद पेंढारे सह आदींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी घेतली आरोग्य विभागाची आढावा बैठक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिह्ला परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभाग जिह्ला परिषद नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये आरोग्य विभागाच्या विविध विषयावर आढावा घेण्यात आला. विविध राष्ट्रीय कार्यक्रम व शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचाव्यात तसेच माता मृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी सर्व स्तरावर उपयोजना करणे, माता मृत्यू व बालमृत्यू कमी करणे. शासनाच्या विविध योजनेचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना मिळाला पाहिजे अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिल्या. त्यांनी माता बाल संगोपन, लसीकरण, माता मृत्यू, बालमृत्यू कमी करणे, राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम, राष्ट्रीय किटक जन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (हिवताप, हत्तीरोग), साथ रोग नियंत्रण कार्यक्रम, सुमन कार्यक्रम, एनकास, काया कल्प, संस्थांचे कन्स्ट्रक्शन, पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी, सिकलसेल तपासणी कार्यक्रम,




राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम, राष्ट्रीय किशोरवयीन सुरक्षा कार्यक्रम, असंसर्गजन्य आजार, संसर्गजन्य आजार कार्यक्रम, बायोमेट्रिक अटेंडन्स असे व अशा या कार्यक्रमांचे अंमलबजावणी होऊन कार्यक्रमाचा उद्देश पूर्णपणे साध्य व्हावा तसेच आरोग्य विभागातील अस्थापना यांनी आपले काम वेळेत पूर्ण करावे अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. या बैठकीला जिह्ला आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिह्ला शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिह्ला आरोग्य अधिकारी डॉ. हिराणी मॅडम, अतिरिक्त जिह्ला शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, सहाय्यक जिह्ला आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, प्रशासकीय अधिकारी नीमलवार, सांख्यिकी अधिकारी डुबुकवाड, आयुष अधिकारी डॉ. मुरमुरे, जिह्ला विस्तार व माध्यम अधिकारी रेणुका दराडे तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जन सुरक्षा विधेयक रद्द करा आझाद क्रांती सेनेची मागणी

माजलगाव - दि.२९ मार्च २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने तहसीलदार मार्फत श्री. जितेंद्र भोळे, सचिव (१) (कार्यभार),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,मु ंबई यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे माजलगाव तहसील कार्यालयाच्या समोर तीव्र निदर्शने करून जनक सुरक्षा विधेयक कायद्याची होळी करण्यात आली सविस्तर वृत्तांत असे की सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३- अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे असून, घटनेच्या मुलभूत अधिकारांविरोधात असल्याने सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट् य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे.

# चकलांब्यात यंदा वस्त्रहरण; चैत्र पौर्णिमेची जय्यत तयारी

बीड : काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेलं, मच्छि ंद्र कांबळी यांचं मवस्त्रहरणफ हे धमाल विनोदी मालवणी नाटक मराठी भाषेत पुन्हा एकदा रंगभूमीवर धूमशान घालण्यास सज्ज होत आहे. या नाटकाचे आजवर ५२५४ प्रयोग झाले असून, लवकरच या नाटकाचा ५ हजार २५५ वा प्रयोग सादर होणार आहे. विशेष म्हणजे चकलंबा येथील कलाकारांच्या संचात या नाटकाचे मोजके ४४ प्रयोग केले जाणार आहेत.मराठी भाषेत रूपांतरित असलेले हे नाटक बघण्याची उत्सुकता लागली आहे,दि १२ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमाच्या दिवशी रात्री ८ वाजता हा नाट्य प्रयोग सादर होणार आहे. या अजरामर कलाकृतीला १६ फेब्रुवारी,२०२५ रोजी ४५ वर्षे पूर्ण झाली.दि १२ एप्रिल रोजी चकलंबा येथे चित्र पोर्णिमेनिमित्त हे नाटक पुन्हा रसिकांच्या भेटीला येत आहे. येत्या चैत्र पौर्णिमेला हे नाटक चकलांबा रंगभूमीवर गावातील कलाकार संदिप पारगावकर,डॉ.विजय सुलाखे,प्रा. सतीश सुलाखे, रविंद्र कानड े,सुभाष चोपड े , उदय सुलाखे,कालिदास चोपडे ,सुरेंद्र सुलाखे,दर्शन नाईक,किशोर खेडकर,मयुर कुलकर्णी,श्याम कोळसे , ऋषिकेश सुलाखे,शुभम चोपडे,कृष्णा कुलकर्णी, उन्मेष सुलाखे,महिला कलाकार -मंजुश्री जोशी,आशा तारे हे कलाकार हा प्रयोग सादर करणार आहेत. नाटकाचे दिग्दर्शन इंजि.संतोष पारगावकर करत आहे तर ,सूत्रधार म्हणून धनंजय सुलाखे,संगीत दिग्दर्शन प्राध्यापक सतीश सुलाखे,संपादक प्रशांत सुलाखे,पुजा सुलाखे/सराफ, अर्णव सुलाखे करणार आहेत.सर्व प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळ चकलंबा यांनी केले आहे.

# किल्ले धारूर भाजपाच्यावतीने शहरात मन की बात

किल्ले धारुर : येथे कैप्टन राजपालसिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या आज दिनांक ३०/३/ २०२५ रोजी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी साहेब यांचा मन की बात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भारतीय जनता पार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा नगरअध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी साहेब, तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश बड़े, भाजपा यूवा मोर्च शहर अध्यक्ष



एडवोकेट मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, नगरसेवक सचिन दुबे, नदीम मोमिन, मन की बात प्रमुख रामप्रभु मु ंडे, संदीप काचगु ंडे, विजय माने, अशोक माने, दत्ता माने, शिवाजी माने, मुस्ताक तांबोली, संतोष सोनटके, अजय माने, राजेंद्र गायकवाड, बालू पांचाल व सर्व पधाधिकारी कार्यकारते उपस्थित होते.

# हर्षवर्धन,रिचा, रेश्मा एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण!

केज : केज तालुक्यातील वरपगाव येथील हर्षवर्धन प्रवीण देशमुख यांचे एमबीबीएस शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथे झाले तसेस रिचा बालासाहेब देशमुख हिचे एमबीबीएस शिक्षण शासकीय मेडिकल कॉलेज संभाजीनगर येथे झाले तसेच रेश्मा संतोष देशमुख हिचे एमबीबीएस शिक्षण विलासराव देशमुख शासकीय मेडिकल कॉलेज लातुर येथे झाले यांनी एमबीबीएस परीक्षेचा अंतीम निकालामध्ये उत्तीर्ण होऊन केज तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात वरपगावच्या नावलौकीकतेत भर पाडली आहे डॉ. हर्षवर्धन हा प्रविण मानीकराव देशमुख वसंत विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचा मुलगा आहे.तसेच रेश्मा ही संतोष उद्धव देशमुख यांची मुलगी असून तीचे वडील संतोष कृषी सेवा केंद्र केजचे संचालक आहेत तसेच डॉ रिता ही प्रसिद्ध शैक्षणिक साहित्य विक्र ेते बालासाहेब जालिंदर देशमुख यांची मुलगी आहे अशी ओळख यांच्या आई वडीलांची आहे

# गेवराईत शेतकऱ्याचे भरदिवसा घर फोडले, नऊ लाखांचा ऐवज लंपास

गेवराई - घराला कुलूप बंद करुन शेतात काम करण्यास गेलेल्या गेवराईतील शेतक याचे भरदिवसा घर फोडून आज्ञात चोरट्यांनी नऊ लाखाहून ऐवज लंपास केल्याची घटना काल दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. मजुरांच्या तुटवडा जाणवत असल्याने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबिय शेतात राबत आहेत. काल शुक्रवारी सुर्डी बुद्रुक ता. गेवराई जि. बीड येथील रणजित तुकाराम सोळंके यांचे कुटुंबीय घर कुलूपबंद करुन शेतात काम करण्यासाठी गेलेले होते. याच संधीचा फायदा घेत आज्ञात चोरट्यांनी कुलुप तोडु न घरात प्रवेश करत भरदिवसा दोन वाजेच्या सुमारास घरफोडी करुन चार लाख रुपये रोख रक्कम तसेच आठ तोळे सोन्याचे दागिने असा जवळपास नऊ लाखाहून आधिक ऐवज लंपास केल्याची माहीती शेतक-याने दिली. दरम्यान शेतकरी रणजित सोळंके यांच्या घरी धाडसी चोरी झाल्याची माहीती तलवाडा यांना मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, फौजदार स्वप्नील कोळी, पोलीस जमादार हनुमंत जावळे, विठ्ठल चव्हाण यांनी घटनास्थळावर दाखल होऊन पाहणी केली. ठसे (फिंगरफ्रीट) घेण्यात आले असून, आज दुपारनंतर किती ऐवज गेला शेतकरी यांच्या माहीतीवरुन गुन्हा दाखल करण्यात येईल असे पोलीसांनी सांगीतले. भरदिवसा घर फोडल्यच्या या धाडसी चोरीने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबियात भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.



बीड उमरद खालसा येथील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील कचरु जाधव यांची मुलगी दिव्या जाधव ही एमबीबीएसच्या फायनल परीक्षेत चांगले गुण घेऊन उत्तीर्ण होऊन डॉक्टर बनली आहे त्याबद्दल तिचे सहपरिवार अभिनंदन करताना..

# नांदेडच्या सामाजिक सलोख्याच्या आदर्शला सण उत्सवाच्या काळात कायम ठेवा शांतता समितीमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे आवाहन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : विविध सामाजिक उपक्रम, व धार्मिक उत्सवासाठी नांदेड शहर हे नावाजलेले आहे. सोबतच गेल्या काही वर्षात अन्य ठिकाणी काही घटना घडल्या तरी नांदेड शहराने आपला सामाजिक सलोखा कायम ठेवला आहे .एप्रिल महिन्यातील सर्व सण उत्सवामध्ये पुन्हा एकदा सर्व समाज बांधवांनी नांदेडचा नावलौकिक कायम ठेवावा,असे आवाहन जिह्ला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आज येथे केले. नांदेड येथे आज जिह्लाधिकारी कार्यालयामध्ये श्री राम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महावीर जयंती, हनुमान जयंती, गुड फ्रायडे, ईस्टर संडे व विविध सण उत्सवाच्या अनुषंगाने जिह्लास्तरीय शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला निवासी उपजिह्लाधिकारी महेश वडदकर यांच्यासह महानगरपालिका पोलीस प्रशासन महसूल प्रशासन



यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख तसेच शांतता समितीचे सदस्य तसेच विविध आयोजन समितीचे मान्यवर उपस्थित होते. प्रामुख्याने सण उत्सवाच्या काळात महानगरपालिकेकडून स्वच्छता,दिवाबत्ती या संदर्भात पूर्तता व्हावी, रस्त्यांची डागडुजी करण्यात यावी, पाणीपुरवठा वेळेत व्हावा आदी मागण्या करण्यात आल्या. जिह्ला पोलीस अधीक्षक तथा निवासी उपजिह्लाधिकारी यांनी शांतता समितीच्या बैठकीमध्ये मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांसंदर्भात सकारात्मक प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच यावेळी सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे आवाहन जिह्ला प्रशासनातर्फे करण्यात आले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला विविध विकासकामांचा आढावा

## विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देणार- उपमुख्यमंत्री अजित पवार

## विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही

बीड दि. 02 :- बीड जिह्लयातील विमानतळ, रेल्वे कामाची सद्यस्थिती, राष्ट्रीय महामार्ग, जिह्ला परिषदे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, शिक्षण विभागाचे नवोपक्रम, इनक्यूबेशन सेंटर तसेच तारांगण, विद्युत वितरण, जिह्लयात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा आज उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आढावा घेतला. बीड जिह्लयांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व सर्व मिळून काम करू, विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देण्यासोबतच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे सांगितले. जिह्लाधिकारी कार्यालयात आज उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आढावा घेतला. यावेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, सर्वश्री आमदार सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडीत, उपमुख्यमंत्री यांचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिह्लाधिकारी अविनाश पाठक, जिह्ला पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिह्ला परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बीड जिह्लयांच्या सर्वांगिण विकासासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व आपण सर्व नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा आहे. राज्य शासनाकडून जिह्लयातील विकासकामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. अशी ग्वाही देतानाचा त्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून रेल्वेमार्गाच्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यात येईल. विभागीय आयुक्त बीड रेल्वेबाबत दर महिन्याला आढावा घेतील. रेल्वे मार्गाच्या कामात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही, अशा प्रकरणी थेट सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतचे गुन्हे नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. विमानतळासाठी आवश्यक जागा बीड शहरापासून 14 किमी अंतरावर असलेल्या कामखेडा नजीक निश्चित करण्यात आली आहे. रेल्वे तसेच विमानतळ सेवा गतीने पुर्ण करण्यात येईल, विमातळाबाबतच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. आष्टी येथील वीज उपकेंद्राच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत उपमुयमंत्री श्री. पवार म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात 2 कोटी घरकुल देण्याची योजना आहे, त्यात राज्यात 20 लाख घरकुल देण्यात येणार आहेत, बीड जिह्लयात सद्यस्थितीत 85 हजार घरकुलाचे काम सुरू आहे, येत्या कालावधीत 75 हजार घरकुले पुर्ण करण्याचे उदिष्ट ठेवून काम करूया. दिवाळी नव्या घरकुलात या उपक्रमाची सुरूवात श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आली. शासकीय निधीची वाट न पाहता घरकूल उभारणाऱ्या 10 कुटुंबाचा यावेळी श्री. पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांसाठी जिह्ला परिषदेच्या वतीने राबविण्यात आलेल्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान गुणवत्ता विकास अभियान 2025 या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या शैक्षणिक सुधारणांतून भावी पिढी चांगली तयार व्हावी, या हेतूने संपूर्ण जिह्लयात हा उपक्रम राबविण्यासाठी जिह्ला वार्षिक योजनेतून आवश्यक निधी देण्यात येणार आहे. जिह्ला परिषदेच्या वतीने शिक्षक वर्गासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण मिळावे यासाठी 30 लाख रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यात गरज भासल्यास सीएसआर तसेच जिह्ला वार्षिक योजनेतून निधी देण्याचीही आपली तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. शालेय परिसर संरक्षक भिंत, शौचालय, अंगणवाडी तसेच शैक्षणिक विकासाला सर्वाच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही असल्याचे श्री. पवार म्हणाले.



जिह्लयातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, आपल्या जिह्लयातील कायदा व सुव्यवस्था चांगली यासाठी पोलीस प्रशासनासोबतच आपल्या प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाला आवश्यक असलेला निधी तातडीने देण्यात येईल. पायाभूत सुविधा, वाहने तसेच पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक त्या बाबींची तातडीची गरज पुर्ण करण्यासाठी 16 कोटी 34 लाख रूपयांचा निधी देण्यात येत असल्याचेही श्री. पवार म्हणाले. जिह्लयात यापुर्वी देण्यात आलेल्या शस्त्र परवान्याचीही पुन्हा पडताळणी करण्यात यावी. गरज तपासूनच शस्त्र परवाना देण्यात यावा,असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले. अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला येत्या वर्षात 50 वर्ष पुर्ण होत असल्याचे निमित्त साधून महत्त्वाच्या कामासाठी आवश्यक निधी शासन स्तरावरून देण्यात येईल. बीड सह लगत असलेल्या परभणी, लातूर व धाराशिव या चार जिह्लयातील रुग्णांची संख्या पाहता सर्व सुविधाही देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. मराठवाड्यातील पहिले कौशल्यवर्धन केंद्र शहराच्या मध्यवर्ती भागात आय. टी. आय. च्या तीन एकर परिसरात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. (Incubation center) टाटाच्या सहकार्याने हे केंद्र आकारास येईल. कंपनीतर्फे १६५.१० कोटी आणि एमआयडीसी कडून ३१.११ कोटी असे एकूण १९६.९८ कोटी खर्च करून याची उभारणी करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील हे पहिले कौशल्यवर्धन केंद्र ठरणार आहे. याआधी विदर्भात चंद्रपूर आणि गडचिरोली व कोकणात रत्नागिरीत अशा केंद्राच्या कामाला सुरुवात झाली आहे. कालबद्ध निधी विनियोग यंदाच्या आर्थिक वर्षात नियोजनपूर्ण निधी विनियोग करण्याचे संकेत श्री. पवार यांनी दिले. लवकरच याबाबत बैठक घेऊन नियोजन निधीतील सर्व बाबी व यंत्रणा यांचा आढावा घेण्यात येणार असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गतिमान पध्दतीने प्रदान करत डिसेंबर २०२५ पूर्वी निधी खर्च होईल तसेच काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. आकर्षक असेल तारांगण एक उत्तम आणि अद्ययावत तारांगण उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व जिह्लाभरातील शाळकरी मुलांना सहलीच्या माध्यमातून माहिती मिळावी हा या उभारणीचा हेतू आहे. बीड शहरात येणाऱ्या प्रत्येकासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ देखील या तारांगणाच्या रूपाने उभे राहणार आहे. येथील आयटीआयच्या मोकळ्या जागेत २० कोटी रूपयांचा निधीतून तारांगण उभारण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध कलाकृती आणि जिह्लयातील प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती ठेवण्याचे नियोजन आहे. जिह्लाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी जिह्ला प्रशासनाच्या वतीने नव्याने उभारण्यात येत असलेल्या विमानतळ, रेल्वे मार्गाची स्थिती तसेच सुरू असलेल्या विविध विकास कामांबाबत सादरीकरण केले. जिह्ला परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने, जिह्ला पोलीस अधीक्षक नववीन काँवत यांनीही आपल्या विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली. यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कधी घेणार खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला प्रश्न



बीड : महाराष्ट्र राज्यामधे गेल्या ३ वर्षापासून ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका झालेल्या नाहीत. या सर्व संस्था प्रशासकांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहेत. प्रशासकांचा ग्रामीण भागातील सर्वदूर थेट संपर्क नसल्याने ग्रामीण भागातील विकास थांबलेला आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कधी घेणार ? केंद्र सरकार काही हस्तक्षेप करणार आहे का ? असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला. दिल्ली येथे सुरू असलेल्या लोकसभेच्या अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना खा.सोनवणे म्हणाले, सन १९९२ मधे संसदेने मंजूर केलेल्या व २४ एप्रिल १९९३ रोजी लागू झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्ती कायद्यानुसार पंचायत राज व्यवस्था स्थापन करण्यात आली. पंचायत राज संस्थांचे अधिकार व जबाबदारी निश्चित करण्यात आले. मी बीड लोकसभा मतदारसंघातून निवडून आलो आहे. मला ३०-३२ वर्ष सलग पंचायत राज व्यवस्थेमधील वेग वेगळ्या संस्थामधे काम करण्याचा अनुभव आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिला परिषदमधे काम करत असताना ग्रामीण भागाच्या विकासामधे पंचायत राज संस्थांचे असलेले स्थान महत्वपूर्ण आहे. मात्र महाराष्ट्र राज्यामधे गेल्या ३ वर्षापासून ग्रामपंचायत, नगर पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका झालेल्या नाहीत. या सर्व संस्था प्रशासकांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहेत. लोकनियुक्त मंडळ नसल्यामुळे सरकार नियुक्त प्रशासक काम करीत आहेत. प्रशासकांचा ग्रामीण भागातील सर्वदूर थेट संपर्क नसतो. त्याना सर्व समस्या माहित नसतात. त्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील विकास थांबलेला आहे. संसदेने सर्व पंचायत राज संस्थांच्या निवडणुका ५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी घेण्यात याव्यात, असा कायदा पारित केलेला आहे. परंतू, सर्वोच्च न्यायालयामधे एक प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्य निवडणुक आयोगाकडून निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात येत नाही. हे पंचायत राज संस्थांचे अपयश आहे. लवकरात लवकर या निवडणुका घेण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करावा. लवकर निवडणुका होण्यासाठी केंद्र सरकार काय करणार आहे?, असा सवाल उपस्थित केला



## महिला आरक्षणा बाबतही चर्चा

स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिलांचे प्रतिनिधित्व वाढविणे व अधिकात अधिक महिलांना निर्णय प्रक्रियेमधे सामील करुन घेण्याच्या उद्देशाने पंचायत राज संस्थांमधे महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा कायदा १९९२ मधे संसदेमधे मंजूर करण्यात आला व दि.२० एप्रिल १९९३ पासून हा कायदा अमलात आला. तेंव्हापासून ग्रामीण भागामधे स्थानिक स्वराज्य संस्थामधील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पंचायत आणि नगर पालिकामधे महिला प्रभावी काम करताना दिसत आहेत. याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत ही समाधानाची बाब आहे. पंचायत राज संस्थांच्या अंतर्गत सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील व अधिक प्रभावाने काम करतील यासाठी सरकार काय योजना करणार आहे ? असा प्रश्न खा. सोनवणे यांनी केला.

# वक्फ विधेयकाचा आणि हिंदुत्वाचा काय संबंध? हे विधेयक उद्योगपतींसाठी : खा. संजय राऊत

भाजपवर निशाणा साधताना राऊत म्हणाले, भारतीय जनता पक्षाला मिशा फुटल्या नव्हत्या तेव्हापासून आम्ही या देशात हिंदुत्वाच्या मिशीला पीळ देत फिरत आहोत. त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. वक्फ विधेयकाचा आणि हिंदुत्वाचा काहीही संबंध नाही. हे विधेयक एक सामान्य विधेयक आहे. या विधेयकात काही सुधारणा करण्याची सरकारची इच्छा आहे. त्या सुधारणांना या देशात केवळ मुस्लिमांचाच विरोध आहे, असे नाही. माझ्या माहितीप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही या विधेयकाला तसा पूर्ण पाठींबा नाही. भाजपने राज्यात औरंगजेबाची कबर तोडण्यासंदर्भात भूमिका घेतली होती. त्यांच्या या भूमिकेला, मयाची गरज नाही, उगाच वातावरण खराब करू नका,फ असे म्हणत संघाने विरोध केला. या बिलासंदर्भातही संघाची भूमिका त्याच पद्धतीची आहे, अशी माझी माहिती आहे. यामुळे, हिंदुत्वाचा विषय आणि या बिलाचा विषय, याचा कुणी मेळ घालत असेल, तर तो मूर्खपणा आहे. राऊत पुढे म्हणाले, या बिलाचा आणि हिंदुत्वाचा काय संबंध आहे, हे फडणवीस सांगू शकतील का? इतर सुधारणावादी जी विधेयके असता, तसेच हेही एक विधेयक आहे. या विधेयकाचा जर संबंध असेलच तर, वक्फ बोर्डाच्या संपत्तीवर भविष्यात कब्जा मिळवण्यासाठी काही उद्योगपतींना सोपे जावे, त्यासाठी या विधेयकाचे स्पष्ट प्रयोजन दिसत आहे. शिवसेना ही प्रखर हिंदुत्ववादी आहे. देवेंद्र फडणवीस आणि



त्यांचे बगलबच्चे वक्फ बोर्डाच्या निमित्ताने जी बांग देत आहेत, हा मूर्खपणा आहे. हिंदुत्व हिंदुत्वाच्या ठिकाणी आहे आणि अशा प्रकारची बिलं त्या ठिकाणी आहेत. आम्ही स्वतः विरोधी पक्षात असताना, भारतीय जनता पक्षाने आणलेल्या कलम ३७० च्या विधेयकाला पाठिंबा दिला आहे ना. कारण तो विषय, राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रिय एकात्मता आणि हिंदुत्वाच्या संदर्भात होता. आम्ही तिहेरी तलाकच्या विधेयकालाही विरोध केला नाही. कारण तो विषय गरीब मुस्लीम महिलांच्या संदर्भात होता. मात्र, वक्फ बोर्ड विधेयकाचा जो विषय आहे, तो त्यांच्या लाखो कोटी रुपयांच्या पॉपर्टी संदर्भातील विषय आहे. भविष्यात त्या प्रॉपर्ट्या आपल्या लाडक्या उद्योगपतींना देता येतील का? त्यासाठी झालेली ही पायाभरणी असल्याचे आम्हाला स्पष्ट दिसते, असा आरोपही संजय राऊत यांनी यावेळी केला. शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार आम्ही सर्व खासदारांनी रात्री येथेच बसून चर्चा केली. आता पुन्हा आम्ही आमच्या पक्ष कार्यालयात बसणार आहोत. आमची भूमिका ठरलेली आहे. तुम्हाला ती शेवटच्या क्षणी दिसेल. असे राऊत यांनी सांगितले. यावेळी, विरोध की पाठींबा अजूनही संदिग्धता आहे? असे विचारले असता, राऊत म्हणाले, संदिग्ध अजिबात नाही. काही गोष्टी फ्लोअरवर गेल्यानंतर करायच्या असतात आणि आम्ही त्या करू.

# मोटार चालकाने दुचाकी स्वाराला नेले फरफटत

पिंपरी ( पुणे-नाशिक महामार्गावर खेड तालुक्यातील खुंबरेनगर येथे मोटार चालकाने दुचाकीला धडक देऊन काही अंतर फरफटत नेले. यामध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. निलेश दत्तात्रय पाटेकर (वय २२, रा. वाकी, खेड), नागेंद्र रामचंद्र प्रजापती (वय २१) अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी निलेश यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलेश आणि त्यांचा मित्र नागेंद्र हे दुचाकीवरून कामावर जात होते. पुणे-नाशिक महामार्गावरून जात असताना खु ंबरेनगर येथे त्यांच्या दुचाकीला मोटारीला पाठीमागून जोरात धडक दिली. धडक दिल्यानंतर मोटार चालकाने निलेश आणि नागेंद्र दोघांनाही काही अंतर फरफटत नेले. त्यानंतर मोटार चालक पळून गेला. या अपघातात निलेश आणि नागेंद्र दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. चाकण पोलीस तपास करीत आहेत. गोडाऊन चौक मोशी येथे एका कंटेनरने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील पती-पत्नी जखमी झाले आहेत. महादेव विश्वनाथ गरड (वय ४५, रा. चऱ्होली बुद्रुक) आणि त्यांची पत्नी सुजाता महादेव गरड (वय ३७ ) अशी जखमींची नावे आहेत. महादेव गरड यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार कंटेनर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महादेव गरड आणि त्यांच्या पत्नी सुजाता गरड त्यांच्या दुचाकीवरून कामावरून घरी जात होते. भोसरी येथून मोशीकडे जात असताना गोडाऊन चौक मोशी येथे कंटेनर चालकाने त्याच्या ताब्यातील कंट ेनर सिग्नल तोडू न हयगयीने चालवला. कंटेनरने गरड यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये महादेव गरड आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. तसेच त्यांच्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे.

# धनंजय मुंडेंनीच पंकजा मुंडेंची सुपारी दिल्याचा दमानियांचा आरोप

मुंबई । प्रतिनिधी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यात आता सख्य आहे. पण काही वर्षांपूर्वी पंकजा मु ंडेंविरोधातले पुरावे घेऊन धनंजय मु ंडे आपले उंबरठे झिजवत होते असा सनसनाटी आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानि यांनी केला आहे. पंकजा मुंडेंविरोधात राजेंद्र घनवट यांनी पुराव्याच्या फाईल्स गोळा केल्याचा दावाही अंजली दमानिया यांनी केला आहे. पंकजा मु ंडेंविरोधात राजेंद्र घनवट आणि धनंजय मु ंडेंनी आणलेल्या फाईल्स आजही घरात पडून असल्याचा दावा अंजली दमानियांनी केलाय. आपण असली कामं करत नसल्याचं त्यावेळी निक्षून सांगितल्याचा दावाही त्यांनी केला आहे. धनंजय मुंडे आणि घनवट यांच्यात प्रचंड सख्य असल्याचं दमानियांनी सांगितलंय. जसं वाल्मिक कराड म्हणजं धनंजय मुंडे तसं राजेंद्र घनवट म्हणजे धनंजय मुंडे असंही समीकरण असल्याचं पंकजांनी सांगितलंय. धनंजय मुंडेंनी त्यावेळी बहीण पंकजांविरोधात सुपारी देऊ केली होती असंही अंजली दमानिया म्हणाल्यात. अंजली दमानियांच्या घरी आपण कधीच गेलो नसल्याचा दावा पोपट घनवट यांनी केलाय. अंजली दमानियांनी केलेले सगळे आरोप त्यांनी फेटाळलेत.धनंजय मु ंडेंवर दमानियांनी गंभीर आरोप केलेत

# मनाचा प्रवास थांबविण्याची साधना परमार्थ आहे -विशाल महाराज खोले

बीड । प्रतिनिधी मानवी जीवनात सतत मिळवत राहावे असे वाटते, त्यात विश्रांती नाही. माणसाचा प्रवास थांबत नाही पण शेवटी मन हे परमात्मा चिंतनात गेले तर तिथे ते रमते व त्यास विश्रांती मिळते. प्रवास थांबतो. म्हणजेच मनाचा प्रवास थांबविण्याची साधना परमार्थ आहे असे प्रतिपादन हरिभक्ति परायण विशाल महाराज खोले मुक्ताईनगर यांनी श्रीक्षेत्र रामगड येथे ४६ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात



दुसरे कीर्तनपुष्पगु ंफतना केले. बीड जवळील श्रीक्षेत्र रामगड येथे गुरुवर्य महंत ब्रह्मलीन महात्मा रामबाबा यांच्या कृपा आशीर्वादाने, वै.गुरुवर्य किसन बाबा, वै.गुरुवर्य लक्ष्मण बाबा, यांच्या प्रेरणेने व गुरुवर्य महंत हरिभक्ति परायण महंत योगीराज महाराज श्रीक्षेत्र रामगड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते सुरू असलेल्या गडाच्या फिरत्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात नये वाटू मन / काही न देखवे ते भिन्न//१//या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्तिपरायण विशाल महाराज खोले मुक्ताईनगर हे तुकाराम महाराजांनी साधकांचा परमार्थाचा आग्रह सांगितलेला आहे. आपुल्या अभंग निरूपणातून बोलतांना हरिभक्तिपरायण विशाल महाराज खोले म्हणाले की, रामगड हे क्षेत्र जसे वर्णन आहे तसेच दिसले. चार ते पाच वर्षात गडाचा अवर्णनीय असा विकास विद्यमान महंत यांनी घडून आणलेला आहे हे दिसून आले .जिथे भजन करावे वाटते, भक्ती ही आपली जिथे मैत्रीण होते त्यास आपण तीर्थक्षेत्र म्हणूया असे हे रामगड तीर्थक्षेत्र बनलेले आहे. प्रपंच व परमार्थ हे दोन क्षेत्र वेगवेगळे आहेत. प्रपंचात माणसास स्थिरता नाही पण जिथे स्थिरता ज्या भक्तीने येते त्या परमार्थात माणसे रमतात .ज्या घरी किंवा ठिकाणी, वैष्णवा घरी सदा सर्वकाळ भगवंताचे नामस्मरण घडत असते जेथे लोक रामात रममान होतात तिथे सुख असते. प्रपंचात रममान होण्यात अस्थिरता आहे. सुख नाही म्हणून आपले इंद्रिय व मन हे आपण देवाकडेच लावावे. दिनरजनी हाची धंदा गोविंदाचे पोवाडे / इतर गोष्टी करू नयेत.

# आधी बंदुकीचा धाक दाखवून तिच्यावर हात टाकला, नग्न करुन झडती, रिलस्टारच्या कारनाम्याने डोंबिवली हादरली

डोंबिवलीतील चर्चित रील स्टार आणि बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र पाटील याच्या विरोधात बलात्काराचा गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. पुण्यातील एका तरुणीला मुंबई एअरपोर्टवर एअरहोस्टेसची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्याने तिला बंदुकीचा धाक दाखवला. या बंदुकीच्या धाकावर बलात्कार केल्याचा आरोप आहे. एवढेच नाही, तर पुन्हा ऑफिसमध्ये बोलावून तिच्यावर अश्लील कृत्य केल्याचा आरोप पीडितेने केला आहे. हा गुन्हा दाखल



होताच सुरेंद्र पाटील पसार झाला आहे. सध्या मानपाडा पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सुरेंद्र पाटीलच्या ड्रायव्हरने देखील अश्लील कृत्य केले काही दिवसांनी, पुन्हा कागदपत्रांसाठी बोलावून त्याने बलात्काराचा प्रयत्न केला. विरोध केल्यावर तिला चोरीचा आळ लावत नग्न करून झडती घेण्याच्या बहाण्याने अश्लील कृत्य केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यात सुरेंद्र पाटीलच्या ड्रायव्हरने देखील अश्लील कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपी सुरेंद्र पाटील सध्या फरार आहे. गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर रील स्टार म्हणून चर्चेत असलेल्या सुरेंद्र पाटीलच्या या गंभीर कृत्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. याआधीही तो पोलिसांच्या खुर्चीत बसून रील बनवल्यामुळे वादात सापडला होता. मात्र, आता त्याच्यावर बलात्कारासारखा गंभीर आरोप झाल्याने पोलिसांची कारवाई महत्त्वाची ठरणार आहे.

## मुंबई एअरपोर्टवर एअरहोस्टेसची नोकरी मिळवून देण्याचे आमिष

डोंबिवलीतील वादग्रस्त रील स्टार सुरेंद्र पाटील याच्यावर आणखी एका गंभीर गुन्ह्याची नोंद झाली आहे. पुण्यातील एका तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार सुरेंद्र पाटील याने तिला मुंबई एअरपोर्टवर एअरहोस्टेसची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. तिला कागदपत्रांसाठी डोंबिवलीतील आपल्या ऑफिसमध्ये बोलावले. तरुणी ऑफिसमध्ये पोहोचताच त्याने तिला एका खोलीत नेले. बंदुकीचा धाक दाखवत तिच्यावर बलात्कार केला. तसेच, हा प्रकार कुठेही सांगितल्यास तिच्या आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी दिली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com